

१४६५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय भु प्रवास
सं. क्र. ५०५५



# ॐ मंगलमूर्ति मोरया



RFFBK-0017198



मुंबई
ठाणे
नासिक
पुणे
औरंगाबाद
अहमदनगर
बीड
जेजुरी
सातारा
रत्नागिरी
हरिहरेश्वर
कोल्हापूर
सांगली
मिरज
पंढरपूर
पैठण

७५२७९
२३।३।७९
८०५

# मंगलमूर्ति मोरया

मोरया गोसावी यांचें चिंचवड

मयूरपुरीं कऱ्हातीरीं रहिवासु केला ।
भक्तिभाव देखोनियां चिंचवडीं आला ।।

ग्रंथ संग्राहक, चिन्तामणि देवे
७५२७९
८०५
२३।३।७९

रामचंद्र चिन्तामण ढेरे

१७१९८
समृद्धी योजना
१९७

किंमत
७५
पैसे

सांस्कृतिक महाराष्ट्र ग्रंथमाला : ८

REFBK-0017198



व्होरा ॲण्ड कंपनी, पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री : १०३ . २ [ १२-६० ]
© १९५८
वो रा ॲ ण्ड क प नी
प ब्लि श र्स प्रा. लि

❋

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शन - माला ११

❋

चौथी आवृत्ति . १९६७

❋

किंमत ७५ पैसे

❋

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांची ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

❋

प्रकाशक :
अ ल. गाडगीळ,
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स, प्राय लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी मुंबई २.

❋

मुद्रक :
अनंत जे शाह
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९.

## सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें, तेथील सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमि; त्या त्या स्थानांतील महत्त्वाच्या मूर्तींची, स्थळांचीं सुरेख विश्वसनीय चित्रे, तेथें जाण्याचे रस्ते, तेथील उत्सव, दर दिवशीचे कार्यक्रम यांची माहिती देणारीं मार्गदर्शक पुस्तकें. या पुस्तकातील भावना फुलविणारा इतिहास आणि डोळसपणा देणारी माहिती वाचून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दर्शनाचें समाधान अवश्य लाभेल.

* मोठा, जाड टाइप, सोपी भाषा; आकर्षक मांडणी.
* हीं पुस्तकें म्हणजे घरबसल्या महाराष्ट्रांतील तीर्थयात्रा आणि संतदर्शने. भाविक यात्रेकरूंना आणि चिकित्सक प्रवाशांनाहि मार्गदर्शक शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांना अति उपयुक्त.
* डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मुंबई राज्य-कडून शालेय ग्रंथालयां-साठीं शिफारस
* लोकशिक्षण समिति, महाराष्ट्र विभाग यांच्याकडून प्रौढ साक्षरां-साठी पुरस्कृत
* असिस्टंट क्यूरेटर ऑफ् लाय-ब्ररीज महाराष्ट्र विभाग यांनीं सार्वजनिक वाचनालयांकरितां विशेष शिफारस केलेली.

# मंगलमूर्ति मोरया

'श्रीगणेशाय नमः':

गणेश ही भारतीयांची प्राचीनतम देवता आहे. गृत्समद, मेधातिथि, कण्व, वसिष्ठ आणि भारद्वाज या वैदिक पंचर्षींनीं गणेशाला मंत्रांजली वाहिली आहे. गृत्समद ऋषि गणेशाला आवाहन करतांना म्हणतो :

"हे ब्रह्मणस्पते, तूं गणांचा अधिपति आहेस. तूं कवींचा कवि आणि ज्ञात्यांचा ज्ञाता आहेस. तूं कीर्तिवंतांत वरिष्ठ आणि राजपुरुषांत ज्येष्ठ आहेस. तुला आम्ही आदरानें आवाहन करीत आहोंत. तूं आपल्या सर्व शक्तींसह ये आणि या आसनावर विराजमान हो."

"ज्याच्या अन्तःस्थ तेजानें अग्नि प्रज्वळतो, सूर्य प्रकाशतो आणि हें विराट विश्व उजळून जातें, त्या गणेशानें आमचें जीवनहि प्रसन्न आणि प्रकाशमय करावें" अशी भारद्वाज ऋषींची प्रार्थना आहे.

ऋग्वेदांतील तेजस्वी आणि मनस्वी गणेशच पुढें पुराणकाळांत शिव-शक्तीचा पुत्र बनून गजाननरूप पावला. 'सुखकर्ता' आणि 'विघ्नहर्ता' अशी त्याची बिरुदावली आहे. तो सकल मंगलाचा निर्माता आणि बुद्धीचा दाता आहे. त्याचमुळें आज शतकानुशतकें जीवनांतील सर्व शुभकार्यांत आरंभ आपण

मंगलमूर्तीच्या पूजनानें करीत आलों आहोंत. 'श्रीगणेशाय नमः' हा आमच्या जीवन-शिक्षणाचा प्रथम पाठ होता. आमच्या वैय-क्तिक आणि सामूहिक जीवनांतील मांगल्याची प्रेरणा गणेशाच्या उपासनेंत आहे. आपल्या महाराष्ट्रानें गणेशोपासना उत्कटतेनें केली आहे. अष्टविनायकांचीं सर्व स्थानें महाराष्ट्रांतच आहेत. मोरगांवचा मयूरेश्वर, सिद्धटेकचा सिद्धिविनायक, पालीचा बल्लाळेश्वर, महा-डचा वरदविनायक, थेऊरचा चिंतामणि, लेण्याद्रीचा गिरिजात्मज, ओझरचा विघ्नेश्वर आणि रांजणगांवचा गणपति हीं तीं अष्टविना-यकांचीं स्थानें. इतिहास-पूर्वकाळापासून गणेशोपासना जगाच्या फार मोठ्या भूभागावर पसरली असल्याचे पुरावे पुरातत्त्ववेत्त्यांना मिळाले आहेत. परंतु आज मात्र महाराष्ट्रांतील हीं आठ गणेश-स्थानेंच विशेषत्वानें जागृत समजलीं जातात. हीं अष्टविना-यकांचीं स्थानें म्हणजे पुराणकालीन गणेशभक्तांच्या तपोभूमी आहेत आणि तेथील गणपती हे भक्तांच्या साधनापूर्तीचे पुरावेच आहेत.

पवित्र पवना :

परंतु या अष्टविनायकांच्या प्रकटीकरणाच्या सर्व कथा पौराणिक आहेत. लौकिक इतिहासाला ज्ञात असलेला महाराष्ट्रांतील महान् गणेशभक्त म्हणजे चिंचवडचे मोरया गोसावी. त्यांच्यामुळें चिंचवड हें एक श्रेष्ठ तीर्थस्थान बनलें. वास्तविक अष्टविनायकांच्या स्थानांत समाविष्ट नसलेलें हें गांव. शिवाय थेऊर आणि मोरगांव हीं गाजलेलीं गणेशस्थानें त्याच्या परिसरांतच आहेत. असें असूनहि चिंचवडचें महिमान सर्वोपरि आहे. भक्ताच्या भावबळानेंच देव सगुणसाकार होऊन अवतरतो; भक्ताचा अंकित बनतो आणि तो म्हणेल तिथें नांदूं लागतो, असा आजवरच्या साधु-सन्तांचा रोकडा अनुभव आहे. चिंचवडचेंहि तसेंच झालें. मोरया

गोसाव्यांच्या सोयीसाठीं मोरगांवचा मयूरेश्वर कऱ्हेचा कांठ सोडून चिंचवडला पवनेच्या कांठीं नांदूं लागला, आपल्या तीर्थजळानें पवनेचें पाणी पावन करूं लागला. इंद्रायणी आणि पवना या मावळच्या माता. त्यांचा जळराशि गोदा, कृष्णा आणि भीमा यांच्याइतका संपन्न आणि सखोल नाहीं; परंतु त्यांच्या पुत्रांनीं आपल्या पुरुषार्थानें आणि परमार्थानें त्यांची कूस धन्य बनविली आहे. ज्ञानोबा, तुकोबा आणि मोरोबा या संतत्रयीच्या निवासानें आणि निर्याणानें पुनीत झालेलीं आळंदी, देहू व चिंचवड हीं तीन स्थानें मराठी संस्कृतीचीं श्रद्धाकेंद्रें बनलीं आहेत. केवळ पंचवीस मैलांच्या परिघांतील ही 'त्रिस्थळी' म्हणजे मावळच्या मराठ्यांच्या शिव-शक्तीचें सात्त्विक अधिष्ठान आहे. इंद्रायणी आणि पवना या दोघीहि विरागिनी आहेत; परंतु त्यांच्या हृदयवीणेवर विश्वप्रीतीची रागिणी सदैव झंकारत आहे. त्यांच्या विमळ जळावर पोसलेल्या तीन पुरुषांनीं भोगावर पाषाण घालून त्यागाचीं महान् मंदिरें उभारलीं आहेत. त्यांच्या अनुभूतीनें आणि वाणीनें महाराष्ट्राची महनीयता आजहि सर्वत्र गाजत आहे. विकारांच्या दास्यांत दडपलेल्या आत्म्याला मुक्त करण्याचा ध्यास हा महाराष्ट्राचा खास विशेष आहे. आत्मस्वातंत्र्याची ही मूलभूत प्रेरणा या भूमींत नांदत राहिलेली असल्यामुळेंच राजकीय पारतंत्र्याविरुद्ध इथेंच ज्वलन्त विद्रोह झडत राहिला.


वर उल्लेखिलेल्या 'त्रिस्थळीं'तील चिंचवड हें क्षेत्र पुण्यापासून केवळ बारा मैलांवर (पुणें–मुंबई रेल्वे मार्गावर, पुण्यापासून अकरा मैलांवर असलेल्या चिंचवड स्टेशनपासून डाव्या हाताला दीड मैल अंतरावर) आहे. पावना नदीच्या कांठावर असलेलें हें गांव सतराव्या शतकाच्या पूर्वींपासूनच एक पेठेचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध होतें. गांवाच्या व्यापाच्या मानानें ब्राह्मण वस्ती बरीच

असल्यामुळें गांवाची सांस्कृतिक श्रेणीहि उंचावलेली होती. तशी इथें कोणतीहि विशेष ऐतिहासिक घटना घडलेली नाहीं. मोरया गोसाव्यांनीं जीवनाच्या अखेरीस हें आपलें निवासस्थान बनविलें आणि इथेंच अखेर चिरविश्रांति घेतली, म्हणून या स्थळाचा महिमा वाढला. त्यांचा पार्थिव देह आणि अपार्थिव अनुभव इथल्या मातीनें हृदयीं धारण केला, म्हणून या पवनाकांठाची पवित्रता आणि पावकता वाढली.

मोरगांवचा मयूरेश्वर :

वास्तविक मोरया गोसावी हे चिंचवडचे नसून मोरगांवचे होते. त्यांचा जन्म मोरगांवींच, मयूरेश्वराच्या कृपाप्रसादानें झाला. त्यांचे आईवडील मूळचे कर्नाटकांतील शाली गांवचे. वडिलांचें नांव वामनभट शालिग्राम आणि आईचें नांव पार्वतीबाई. हें सत्त्वगुणसंपन्न परंतु निष्कांचन असलेलें दांपत्य आपलें गांव सोडून निघालें आणि पुणें प्रांतीं मोरगांवला येऊन राहिलें. मोरगांव हें अष्टविनायकांपैकीं मयूरेश्वराचें स्थान. पुराणांतरीं या क्षेत्राचा महिमा पुष्कळच वर्णिलेला आहे. जेजुरीपासून दहा मैलांवर कऱ्हा नदीच्या कांठीं असलेलें हें मोरगांव 'मयूरपुरी' किंवा 'स्वानंदपुरी' म्हणून पुराणांत उल्लेखिलेलें आहे. इथला मयूरेश्वर हा 'स्वानंदेश' असल्यामुळें हीं दोन्ही नांवें पडलेलीं आहेत. या तीर्थाच्या उदयाची कथा रोमहर्षक आहे : "मिथिल देशांत सिंधुदैत्य अत्यंत मातला आणि त्यानें आपल्या आसुरी कृत्यांनीं देवांना संत्रस्त केलें. तेव्हां देवांनीं स्वानंदेश गणेशाला प्रसन्न करून घेण्यासाठीं यज्ञ केला. यज्ञानें प्रसन्न झालेला विघ्नहर्ता गणराज यज्ञांतून निर्माण झालेल्या सुवर्णमयूरावर आरूढ झाला आणि त्यानें सिंधुदैत्याचा निःपात केला. या सिंधुविजयानंतर गणेश परत फिरतो न फिरतो, तोच वाटेंत सिंधुदैत्याचा सेनापति कमलासुर यानें

त्याला अडविलें. गणेशानें आवेगांत त्याचेंहि शिर उडविलें. तें शिर इथें येऊन पडलें. त्यानंतर विजयी गणेश त्या शिराचेंच आसन करून इथें विसांवला."



मोरगाव येथील मयूरेश्वर

असें पौराणिक माहात्म्य पावलेलें मोरगांव हें लहानसेंच गांव आहे. परंतु तेथलें देऊळ प्रेक्षणीय आहे. मुसलमानांच्या मशिदीचा आभास निर्माण करणारा कोट या मंदिराभोंवतीं आहे. बेदरच्या बादशाहींत जामदारखान्याचे अधिकारी असलेल्या श्री. मोरेश्वर केशव गोळे नांवाच्या गृहस्थांनीं हा कोट उभारला. मंदिराच्या महाद्वारीं दोन दीपमाळा, मध्यें एक जयस्तंभ, मूषक व नंदी आहे. महाद्वारांतून आंत गेल्यावर मोकळें प्रांगण असून, त्यांतहि दोन दीपमाळा आहेत. या प्रांगणाच्या पुढें सभामंडप,

मध्यगृह आणि गाभारा असे तीन विभाग असलेलें पाषाणाचें मंदिर आहे. तटाच्या आंतल्या बाजूला ओवऱ्या बांधलेल्या आहेत. बेल, शमी, आवळी इत्यादि पूजाद्रव्यांचे वृक्ष प्राकारांतच आहेत. मंदिराच्या शिखरावर सभोंवतीं गणेशलीला चितारलेल्या आहेत. या मंदिरांतील गणेशाचें दर्शन घेत असतांनाच समर्थांना सर्व महाराष्ट्रानें कंठीं धारण केलेली ती मंगलमूर्तीची आरती स्फुरली, असें म्हणतात. शेंदुराची उटी ल्यायलेल्या या तुंदिलतनु मूर्तीपुढें भक्तिभरानें उभे राहिलेले समर्थ अंतरींच्या उमाळ्यांतून गाऊं लागले—

सुखकर्ता, दुःखहर्ता, वार्ता विघ्नाची—
नुरवी, पुरवी प्रेम कृपा जयाची।
सर्वांगीं सुंदर उटी शेंदुराची,
कंठीं झळके माळ मुक्ताफळांची।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती!
दर्शनमात्रें मनःकामना पुरती।

देवाच्या डाव्या हाताला 'विघ्नहराची ओवरी' आहे. या ओवरींत सतराव्या शतकाच्या अखेरीस गणेशयोगींद्र नांवाचे एक थोर गणेशभक्त रहात असत. गणेश-पुराणावर मराठी टीका लिहिणारा हा सत्पुरुष मोठा योगाधिकारी आणि परम गणेशभक्त होता. त्यांच्या निवासानें मोरगांवची पुराणप्रसिद्ध भूमि नव्या पावित्र्यानें उजळून निघाली. या ओवरींत त्यांनीं बारा वर्षें निष्ठेनें गणेशाराधना केली. आपली भक्तिभावना कुंचल्यांतून साकार करण्याचें एक आगळें सामर्थ्य गणेशयोगींद्रांजवळ होतें. त्यांनीं स्वतः काढलेलीं गणेशलीलांचीं अनेक चित्रें या ओवरीच्या भिंतींवर आजहि पहावयास मिळतात. मोरगांवच्या देवस्थानाच्या

वृद्धीसाठीं गणेशयोगींद्रांनी खूप परिश्रम केले आहेत. शके १७२७ च्या माघ वद्य १० ला त्यांनीं समाधि घेतली.

मयूरेश्वराचा भक्त – मोरया :

या गणेशयोगींद्रांच्या पूर्वी बराच काळ–सोळाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास – वामनभट शाळिग्राम मोरगांवीं सपत्नीक येऊन राहिले. त्यांना मूलबाळ नव्हतें. 'दर्शनमात्रें मनःकामना पुरवणाऱ्या' गणेशाची त्यांनीं उपासना केली आणि श्रीचरणीं पुत्रप्राप्तीचा वर मागितला. वामनभटाच्या उपासनेनें प्रसन्न झालेल्या गणेशानें जणु त्याच्या मस्तकीं कृपाकर धरला आणि त्या कृपेमुळें वामनभटाला उतारवयांत पुत्रलाभ झाला. मयूरेश्वराच्या कृपेनें पुत्र झाला म्हणून त्याचें नांव 'मोरया' असें ठेवलें. हा 'मोरया'च पुढें थोर गणेशभक्त बनला.

मयूरेश्वराच्या कृपेनें जन्मलेला हा मोरया सत्त्वगुणसंपन्न मातापित्यांच्या सहवासांत सत्त्वशील न बनला तरच आश्चर्य! शुद्धबीजापोटीं 'रसाळ फळां'चाच उद्भव होणार. आठव्या वर्षी मोरयाची मुंज झाली. अत्यंत लहान वयांत या तीव्र प्रज्ञेच्या मुलानें वेदाध्ययन पूर्ण केलें आणि आपल्या असामान्य गुणांनीं मातापित्यांना धन्यतेचें सुख प्राप्त करून दिलें. मोरयाच्या अभिजात प्रज्ञेला प्रभु-प्रीतीची जोड लाभल्यामुळें त्याचें तेज दिवसेंदिवस अधिकाधिक खुलूं लागलें. या विकासाच्या वाटचालींतच एके दिवशीं सिद्ध योगिराज नांवाचा सत्पुरुष मोरयाला भेटला. सिद्ध योगिराजानें या भक्तिप्रवण मुलाचें हार्द ओळखलें आणि त्याला थेऊर येथें जाऊन तपश्चर्या करण्याचा आदेश दिला. गुर्वाज्ञेनें मोरया मोरगांवाहून निघाला तो थेऊरास आला. तेथें चिंतामणीच्या चरणांचें स्मरण करीत त्यानें बेचाळीस दिवस आसन मांडलें. अन्नपाणी वर्ज्य केलें आणि ध्यानाच्या द्वारांतून प्रभूचीं पावलें हृदयांत उमटल्याशिवाय

आसन सोडायचें नाहीं, असा मनाशीं निर्धार केला. प्रभुदर्शनाची उत्कंठा शिगेस पोंचली होती. विवेकाच्या झाडणीनें हृदयांतील षड्‌विकार झटकून टाकले होते. शुद्ध भक्तीचें सडासंमार्जन करून हृदयप्रांगण प्रभुसंचाराला योग्य बनविलें होतें. अशा स्थितींत तो भावाचा भुकेला प्रभु, ती मोरयाच्या नित्यचिंतनांतली गणेशाची मंगलमूर्ति ध्यानावस्थेंत दृष्टिगोचर झाली. त्या मंगल दर्शनानें मोरयाच्या सर्वांगावर पुलकफुलांचा फुलोरा फुलला; हृदयांतून आनंद ओसंडूं लागला; सुखातिशयानें नेत्र पुंजाळले आणि एका अलौकिक तेजानें सारा आसमंत मोहरून गेला.

साक्षात्काराचा ठेवा लुटून मोरगांवीं परतल्यावर मोरयाचे 'मोरया गोसावी' बनले. मयूरेश्वर जणु मोरया गोसाव्यांच्या सहवासांत वावरूं लागला. गणेशरूप बनलेल्या या भक्ताच्या रूपानें बहुजनांनाहि देव नित्य भेटूं लागला; त्यांचीं संकटें निरसूं लागला. त्यांचीं आंसवें कनवाळूपणें पुसूं लागला. ईश्वराचें तें चालतें-बोलतें मंगलरूप पाहून लोकांचीं हृदयें भक्तीनें भारावत, आदरानें लवत आणि पापाची लाज वाटून परिशुद्धहि होऊं लागत.

चिंचवडच्या वाटेवर :

वृद्ध माता-पित्यांच्या देहावसानानंतर मोरयांनीं मोरगांव सोडलें आणि विषण्ण मनाला शांति लाभावी, म्हणून त्यांनीं चिंचवड येथें पवनाकांठच्या निसर्गसुंदर एकान्ताचा आश्रय घेतला. येथेंच त्यांनीं परमेश्वराच्या विराट स्वरूपाचें चिंतन करीत प्रदीर्घ काळ काढला. दर्शन देऊन क्षणोक्षणीं अदृश्य होणाऱ्या मंगलमूर्तीला हृदयांत अखंड कोंडून ठेवण्यासाठीं आर्त होऊन प्रार्थना केली. विश्वाकार विराट् विनायकाची अनुभूति लाभण्यासाठीं आपलें हृदय गगनाच्या गाभ्याएवढें विशाल बनविलें आणि अखेर येथेंच देहाचा

घट फोडून परमात्म्याशीं आत्म्याचा प्रत्यक्ष संगम साधण्यासाठीं जिवंत समाधि घेतली.

या समाधि-मंदिराचेंच दर्शन घेण्यासाठीं आपणास चिंचवडास जाण्याची ओढ आहे.

चिंचेच्या झाडांची विपुलता असल्यामुळें 'चिंचवड' हें नांव पावलेलें हें गांव गांठण्यासाठीं स्टेशनपासून मैल-दीड मैल चालावें लागेल. पायांना थोडेसे श्रम पडतील—परंतु श्रमावांचून इष्टदर्शनाची अपेक्षा तरी कां धरावी ? ज्यांनीं आपलीं जीवनें होमून त्या यज्ञाच्या ज्वालेंतून विश्वमंगलाचें वरदान मिळविलें त्या महात्म्यांच्या समाधीचें दर्शन घ्यायची इच्छा ठेवायची आणि आपलीं शरीरें मात्र श्रमूं द्यायचीं नाहींत, हें ठीक नव्हे.

रस्ता तसा सुगम आहे. एके काळीं गांवाला मजबूत तट होता. त्याचे अवशेष गांवाजवळ जातांच अजूनहि दृष्टोत्पत्तीस येतात. तटाला असलेल्या चार वेशींपैकीं दोन-तीन अजूनहि उभ्या आहेत. आज मात्र वेशीबाहेरहि गांवाची बरीच वस्ती थाटलेली आहे. पवना नदी दक्षिणवाहिनी वनून गांवाला वळसा घालून जात असल्यानें गांवाला निसर्गरमणीयता प्राप्त झाली आहे. गांवाजवळ आल्यावर गांवांत न शिरतां उजव्या हातानें नदीतीराकडे वळल्यावर नदीच्या अगदीं कांठावर श्रीमोरया गोसावी आणि त्याचे सात वंशज यांचीं समाधि-मंदिरें आहेत.

या समाधि-मंदिरांच्या सभोंवती मजबूत तट आहे. हा तट तीनशें वर्षांइतका जुना आहे. देवालयाच्या दक्षिणेस व उत्तरेस दोन प्रशस्त पटांगणें आहेत. या ठिकाणीं पूर्वीं बाग होते. हल्लीं अनेक वर्षांपासून या पटांगणांचा उपयोग उत्सवप्रसंगीं भोजन-पंक्तींसाठीं आणि फुलप्रसादांचीं दुकानें थाटण्यासाठीं केला जातो. तटाच्या आंत श्रीमोरया गोसावी यांचें मुख्य समाधि-मंदिर

असून, त्याला लागूनच त्यांच्या पुत्रपौत्रादींच्या सात समाध्या आहेत. त्यामुळें या सत्पुरुषाचा सर्व परिवार एकाच दृष्टिक्षेपांत पाहतां येतो. मंदिराच्या पार्श्वभागीं तटाबाहेर पवनेचा प्रवाह संथपणें वाहत असतो. या ठिकाणीं पवनेच्या पात्रांत उतरण्यासाठीं घाट बांधलेला असून, घाटावर जाण्यासाठीं समाधीमागें तटाला एक द्वार आहे. आपल्या कुशींत विसावलेल्या भक्तवराला लाटांच्या सहस्रकरांनीं कुरवाळण्यासाठीं पवनामाई याच द्वारानें वर्षाकाळांत आंत शिरते.

या द्वारांतून घाटावर उतरून पवनेच्या पवित्र जळानें स्नान करावें आणि शुचिर्भूत होऊनच दर्शनास जावें. हा घाट माणसांनीं



समाधि-मंदिराजवळील पवना-घाट

त्रिकाळ फुलून गेलेला असतो. कोणी पौरांगना पाण्यानें भरलेले घट कटि-शिरावर घेऊन घरीं चाललेल्या असतात; कोणी कर्मनिष्ठ स्नान करून, ललाटावर विभूति चर्चून गंभीरपणें संध्यावंदन करीत असतात; कोणी ओलेत्यानेंच तांब्यांत पाणी घेऊन शिवलिंगार्चनाला निघालेले असतात; तर कोणी पवना-माईच्या प्रवाहांत जलक्रीडा करीत असतात. अशा या गजबजलेल्या

घाटावर स्नान करतां करतां नदीच्या पैलतीराकडे दृष्टि टाकली कीं, आल्हाददायक सृष्टिशोभा दिसूं लागते. लहान लहान डोंगरांच्या रांगा, मधूनच वाहणारा पवनेचा प्रवाह, जीवनाचा जयजयकार करीत नटलेला वृक्षलतांचा हिरवा उत्साह आणि वन-गंधाचें अर्घ्य मोरयाचरणीं अर्पिण्यासाठीं धांवत येणारा नदी-कांठचा शीतल वारा यांमुळें शरीर आणि मन सुखावून जातें.

'माझें तनुमन गुंतलें मोरयापाशीं'

याच नदीकाठीं, निर्जन एकान्तांत, वृक्षलतांच्या सुखद सान्निध्यांत, निळ्या नभाच्या घुमटाखालीं मोरया गोसाव्यांनीं अध्यात्म-साधना आचरली. मातापित्यांच्या विरहानें व्याकुळलेलें त्यांचें मन चिरशान्तीच्या प्राप्तीसाठीं एकान्त शोधीत इथें आलें.

इथें पवनेच्या प्रशान्त प्रवाहाकाठीं पर्णकुटी बांधून हा परम-निग्रही परमार्थसाधना करूं लागला. थेऊरास झालेल्या क्षण-दर्शनानें व्यापक अनुभवाची—परमात्मरूप बनण्याची अधिकच ओढ निर्माण झाली होती. जणु त्यांचें मन विरही बनलें होतें. एखाद्या भग्नहृदय विरहिणीप्रमाणें त्यांचा आत्मा परमात्म्याच्या मीलनासाठीं व्याकुळ बनूं लागला. थेऊरच्या प्रथमदर्शनाची 'झडपणी' झाल्यापासून त्यांचे सर्व जीवनव्यापार अस्वस्थ बनले होते. आतां इथें तर निगूढ एकान्तांत ती अंतरींची असीम आर्तता आक्रोश करूं लागली. लौकिक सुखें आपल्या हातानें उध्वस्त केलीं होतीं आणि अलौकिक सुख मात्र पुरतेपणीं हातीं लागलें नव्हतें; तें लपंडाव खेळत होतें—वाकुल्या दाखवून दूर पळत होतें—साधकाच्या आत्म्याची क्रूर कसोटी पहात होतें.

सुखें नांदत होतें मी संसारीं वो। तव अवचित जालि ये परी वो।
मज संचार जाला ये शरीरीं वो। मज नेउनी घाला मोरेश्वरीं वो।

सकळिक म्हणती झाली झडपणी । बोलवा पंचाक्षरी, करा झाडणी ।।
माझें तनुमन गुंतलें मोरयापाशीं वो । नेणतीं बापुडीं करती जाचणी वो ।।
दास तुझा मोरया गोसावी वो । या हो मोरयाविगळें नेणें कांहीं वो ।।

अशी दारुण अवस्था होऊन गेली. हें 'देवपिसें' अन्नपाणीहि गोड लागूं देईना. ऋतुचक्रांतून घडणाऱ्या त्याच्या ओझरत्या दर्शनांतून हृदयाची शांति आणखीच ढळूं लागली. वसन्ताच्या उन्मत्त गन्धविलासांतून, वर्षेच्या धारानृत्यांतून आणि शरदांतल्या भावकातर चांदण्यांतून त्याचीं नानाविध रूपें जाणवूं लागलीं. तो पहाटेच्या क्षितिजावर आरक्त प्रभेसह संचार करणारा, संध्येच्या प्रांगणात रंगोत्सव खेळणारा, उत्तररात्रीं नक्षत्रांच्या गवाक्षांतून खुणावणारा, फुलांतून हंसणारा आणि वायूंतून मुक्त विहार करणारा नटचंचल हृदयाच्या मंजूषेंत पकडून कसा ठेवायचा ? पण तोहि भक्तवेडा आहे. कांहींसा छळील–पिळील, पण अंतीं करुणेची पांखर घालून जवळ करील. अगदीं जवळ–एकरूप ! हा क्षण येण्यासाठीं त्याची करुणा भाकण्यावांचून अन्य उपाय नाहीं—

तुजविण कोण आम्हां आहे रे मोरया ?
तुझिया भेटीची बहु आस रे मोरया
देखतां तुज बहु दिवस झाले रे मोरया
रात्रंदिवस वाट तुझी पाहे रे मोरया
जन्मोजन्मींचा तुझा दास रे मोरया
आणिक कोणाची चाड नाहीं रे मोरया
एक वेळ कृपादृष्टीं पाहे रे मोरया
धेनु वत्सालागीं जैसी मोहे रे मोरया
तैसा वेगीं येई तूं लवलाही रे मोरया

अखेर तो दयाघन भक्ताच्या भावभक्तीनें तुष्ट झाला आणि त्याच्या हृदयांत अवतरला. हृदय विस्तारलें—गगनाहूनहि व्यापक बनलें. कारण त्या भावोन्मत्त गणराजाला भक्ताच्या हृदयमंचावर नृत्य करायचें होतें –

आधार चक्रीं नृत्य मांडिलें थोर
टाळ-मृदंग श्रुती वाजती गभीर
ब्रह्मा, विष्णु आदि उभे शंकर
निर्गुणब्रह्म कवणा न कळे च पार

नृत्य करितां शेष करी डळमळ
कूर्म लपवी मान राहे निश्चळ
भारें विक्राळ दाढा उपडूं पाहे समूळ
गिरि गिरि भोंवरे देत सप्तहि पाताळ

कड कड कड कड आकाश तडके दारुण
गड गड गड गड गर्जे गर्जे गगन
चळ चळ चळ चळ पृथ्वी कांपे त्रिभुवन
धिग् धिग् धिग् धिग् नृत्य करी गजानन

ऐसें तांडवनृत्य झालें अद्‌भुत
हरिहर ब्रह्मादिक उभे तटस्थ
मोरया गोसावी योगी ध्यानस्थ
एकरूप होऊनि ठेलें अद्वैत !


द. क्र.
संग्रह शाखा

या विराट् अनुभवानंतर त्यांच्या हृदयाला निश्चल शांति लाभली. जलपृष्ठावरच्या उत्तुंग तरंगांनीं आंतली गंभीरता न सोडणाऱ्या सागराप्रमाणें लौकिक जीवन जगूनहि अलौकिकाची अखंड सोबत त्यांनीं सोडली नाहीं. त्यांनीं प्रपंच केला, पण तो अंतर्बाह्य परमार्थानें उजळून टाकला. प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड

घालणारें त्यांचें जीवन आठवून आपल्याला त्यांच्या समाधि-दर्शनाची अधिकच ओढ वाटूं लागते.

**'मंगलमूर्ति मोरया'** :

प्रपंच-परमार्थाचा मेळ साधीत आणि दीन-दलितांचीं सांकडीं फेडीत मोरया गोसाव्यांनीं जीवन कृतार्थ बनविलें. त्यांच्या समाधीचें दर्शन तुम्हां-आम्हांला प्रेरक ठरेल. आपण सभामंडपांत प्रवेश करून श्रीमोरया गोसाव्यांच्या समाधीकडे तोंड करून उभे राहिलों कीं, आपल्यामागें त्यांचे सुपुत्र श्रीचिंतामणि महाराज यांची समाधि आहे. पिता-पुत्र इथें परस्पराभिमुख होऊन विसावले आहेत. सभामंडपापुढें मध्यमंडप आहे. मध्यमंडपांत उजव्या हाताला महादेवाची पिंडी आहे. या मध्यमंडपानंतर समाधींचा गाभारा आहे.




घाटावरील समाधि-मंदिरें ( एक-दृश्य )

इ. स. १६५५ चा सुमार असेल. जीवनांत कृतार्थता प्राप्त झाल्यावर श्रीमोरया गोसाव्यांच्या मनांत देहाचा निरोप घेऊन अनन्ताशीं समरसण्याचा-जिवन्त समाधि घेण्याचा-विचार तरळूं

लागला. त्यांना आतां कांहींहि साधावयाचें नव्हतें—कांहींहि उपभोगावयाचें नव्हतें. घट फोडून बिंदु सिंधूला मिळविणें एवढेंच काय तें उरलें होतें. तो सोहळा 'याचि देहीं याचि डोळां' स्वेच्छेनें साजरा करावा, असें त्यांनीं योजलें. त्यांचा पुत्र यावेळीं पसतिशीचा असून प्रपंच-परमार्थांत सारखाच अधिकारी होता. थेऊरचा चिंतामणीच आपल्या घरीं नांदावयास आला आहे, या कल्पनेनें त्याचें नांव त्यांनीं 'चिंतामणि' ठेवलें होतें. ज्यांचा सारा प्रपंच मंगलमूर्तीनें मंगल करून टाकला होता, त्यांना घरीं-दारीं मंगलमूर्तीच्याच संचाराचा प्रत्यय येणार. मोरया गोसावी चिंचवड आणि मोरगांव इथें आलटून-पालटून रहात. इ. स. १६३५ ते १६३९ या काळांत त्यांनीं सहकुटुंब काशियात्रा करून संतांच्या सान्निध्यांत सुखसंवादाचा आनंदहि लुटला होता. मोरगांव-चिंचवडच्या नित्य-नैमित्तिक उपासनेसाठीं दानें आणि इनामेंहि मिळत राहिलीं होतीं. त्यांच्या साधुत्वाचा आणि सिद्धीचा सुगंध दूरवर दरवळूं लागला होता. अशा पार्श्वभूमीवर त्यांचा जिवन्त समाधीचा निर्णय त्यांच्या कृतार्थ जीवन-मंदिरावर कीर्तिकळस चढविणाराच ठरला.

मार्गशीर्षांतली वद्य षष्ठी. धूसर क्षितिजावर उषेची आरक्त कांति रंगूं लागली आहे. पवनेचा पवित्र प्रवाह संथपणें वहात आहे. तीरावरच्या तरुपर्णांतून विहंगांचीं उषःसूक्तें प्रगटूं लागलीं आहेत. सुगंधाचे निःश्वास सोडून फुलें जागीं झालीं आहेत. साऱ्या स्थिर-चरांतून हंसरी प्रसन्नता उमलूं लागली आहे. अशा शुभ वेळीं मोरया गोसावी पवनेच्या पात्रांत उतरले. पवनामाईच्या जळांतलें तें त्यांचें अखेरचें स्नान. त्या देहाच्या अनन्त स्पर्शांनीं पवना खरोखरच 'पावना' झाली होती. त्याचमुळें त्यांच्या अंतिम स्नानाची जाणीव होऊन जणु तिचेंहि हृदय व्याकुळ झालें. जणु त्या प्रेमळ पवनामाईच्या जळाचा स्पर्श त्यावेळीं अधिक मवाळ झाला

होता—बाळाच्या अंगावर फिरणाऱ्या आईच्या मायाळू हातासारखा ! मोरयांनीं स्नान उरकलें आणि प्रवाहांत उभें राहून उगवत्या सूर्याला अर्घ्य दिले. त्या चैतन्यमय, तेजोमय सूर्यानें मोरयांच्या अन्तःस्तेजाला भेटीचें आमंत्रण दिलें ! मोरयांचें हृदयहि संगमोत्सुक होऊन वेगानें स्पंदन पावूं लागलें. संध्यावंदन उरकल्यावर ते कांठावर आले. त्यांनीं मंगलमूर्तीचें यथासांग पूजन केलें आणि ते



मोरया गोसाव्यांच्या समाधि-मंदिरांतील श्रीगणेश मूर्ति


चिंतामणीनें तयार केलेल्या गुहेंत प्रवेशले. गुहेंतील भूमि समतल आणि शुद्ध होती. तेथें मोरया पद्मासन करून बसले. चिंतामणीनें त्यांच्यापुढें दोन दीप प्रज्वलित करून ठेवले आणि समोर 'गणेशपुराण' मांडलें. मोरयांनीं गणेश-लीलांचें मनोमन चिंतन करीत दृष्टि नासाग्रीं लावली. चिंतामणीनें सपत्नीक प्रणिपात केला आणि गुहेबाहेर येऊन जड अन्तःकरणानें गुहेच्या द्वाराला शिळा लावली. पहातां पहातां

ध्याता आणि ध्येय यांची एकरूपता झाली–ज्योतींत ज्योत मिळाली. मोरया आणि मंगलमूर्ति यांचें संपूर्ण अद्वैत झालें.

–समाधीसमोर माथा टेकवितांना हीं सारीं दिव्य दृश्यें अन्तश्चक्षूंसमोर तरळून जातात आणि आपल्या मुखांतून नकळत उद्‌गार उमटतो – "मंगलमूर्ति मोरया !"

'दास चिंतामणी विनवी चरणीं :'

मोरयांचें दर्शन घेऊन मधल्या सभामंडपांत आल्यावर श्रीचिंतामणी महाराजांची समाधि समोर दिसते. या मधल्या सभामंडपांतून मोरयांच्या समोरच्या दारांतून आंत शिरल्यावर जें दालन लागतें त्यांत आद्यचिंतामणींचे पणतू दुसरे चिंतामणि महाराज विसावले आहेत. तेथून आंत गेल्यावर खोल भागीं आद्य चिंतामणींची समाधि आहे. त्याहिपुढें एक गभगारवजा दालन आहे. या दालनाला बाहेरून असलेला दरवाजा हेंच चिंतामणींच्या समाधीचें प्रमुख प्रवेशद्वार होय. या प्रवेशद्वारापासून श्रीमोरयांच्या समाधीच्या गाभाऱ्यापर्यंत सर्व समाधि-मंदिर सलग, लांबच लांब आहे. या




घाटावरील समाधि-मंदिरें (आणखी एक दृश्य)

मंदिराच्या डाव्या बाजूला चिंतामणींचे पुत्र थोरले नारायण महाराज (मोरया-समाधीच्या मध्यमंडपाला लागून), थोरल्या नारायण महाराजांचे नातू धरणीधर महाराज, धरणीधर महाराजांचे पुत्र धाकटे नारायण महाराज आणि धाकट्या नारायण महाराजांचे पुत्र तिसरे चिंतामणि महाराज यांचीं समाधि-मंदिरें आहेत. तिसऱ्या चिंतामणि महाराजांच्या समाधीसमोर त्यांचे दत्तक पुत्र व या घराण्यांतील अखेरचे सत्पुरुष धाकटे धरणीधर महाराज यांची समाधि आहे.

सतत सात पिढ्या भगवद्भक्तीची उत्कट परंपरा राखणारें हें भाग्यवान् घराणें मोरया गोसावी आणि त्यांचे पुत्र चिंतामणि गोसावी यांच्या प्रतीतिप्रभावानें 'देव'-पदाला पोंचलें. त्यांचें मूळचें 'शालिग्राम' हें उपनाम लुप्त झालें आणि त्यांना सर्व लोक 'देव' म्हणूनच संबोधूं लागले. या सातहि सत्पुरुषांची अल्पस्वल्प स्फुट रचना उपलब्ध आहे.

चिंतामणि गोसाव्यांनीं वडिलांचा वारसा स्वीकारून त्यांची गणेशभक्ति सतत चालविण्यासाठीं आणि गणेशभक्तीचा सर्वत्र प्रसार करण्यासाठीं प्रयत्नांचे पर्वत उभारले. त्यांनींच आपल्या पित्याच्या समाधि-शिळेवर मंदिर उभारलें. या मंदिराचें बांधकाम २७ ऑक्टोबर १६५८ ते १३ जून १६५९ या कालावधींत पूर्ण झालें. मंदिराच्या उभारणीचें काम सुरू झाल्याची व संपल्याची मिति या मंदिरावरील शिलालेखांत नोंदविलेली आहे.

शके १५८० विलंब सवत्सर
कार्तिक शुध १२ ते दिवसि
देवालयास आरभवि
कारिमहे आषाढ शुध
४ सोमवारि सपुर्ण



समाधि-मंदिरावरील शिलालेख

समाधि-मंदिर बांधून झाल्यावर या ठिकाणीं उत्सव-महोत्सव सुरू झाले आणि दर्शनार्थ लोकांची रीघ लोटूं लागली. चिंतामणींना भक्तीचा पैतृक वारसा आणि गुरुपदेश श्रीमोरयांनीं दिला. पिता हाच त्यांचा गुरु. त्यांनीं बराच काळ विकारांचा सासुरवास सहन केला; परंतु भक्तिसुखाचें माहेर त्यांच्या घरीं-दारीं नांदत असल्यानें निजरूपाची प्राप्ति त्यांना अल्प सायासानें झाली. भक्तीचें अंजन लेवून त्यांनीं अनुभूतीच्या दर्पणांत निजरूप न्याहाळलें आणि मग त्यांचें सारें जीवन समदृष्टीनें व्यतीत होऊं लागलें.

गणराजचरणीं माझें लुब्धलेंसें मन ।
पहावया निजरूप द्यावें भक्तीचें अंजन ॥
समदृष्टि झालिया जीवा होईल समाधान ।
न बोले लटकें, विघ्नराजा, तुझी आण ॥


पौष वद्य ४ शके १५९० (इ. स. १६६८) या दिवशीं, पित्याच्या समाधीनंतर एक तप लोटल्यावर चिंतामणि गोसावी

समाधिस्थ झाले. पित्याच्या चरणींच त्यांनीं अखेरचा ठाव स्वीकारला. त्यांच्या समाधीचें दर्शन घेतांना आपल्या आंतल्या कानांना त्यांचें हृद्‌गत आजहि जाणवूं लागतें :

दास चिंतामणी । विनवी चरणीं ॥
राहिन मी तुझे पायीं । मज आणिक ठाय नाहीं ॥

<u>भक्ताघरीं नांदे देव :</u>

समाधीचें दर्शन घेऊन उजव्या हाताच्या वाटेनें गांवांत प्रवेश केल्यावर जवळच 'मंगलमूर्तीचा वाडा' लागतो. या देवस्थानाची



'मंगलमूर्तीचा वाडा' आतील भाग

प्रसिद्धि आणि उभारणी पेशवाईंत झालेली असल्यानें देवालाहि मंदिराऐवजीं वाडाच पसंत पडला असावा. वाड्याला सभोंवतीं उंच कोट आहे. आंत प्रशस्त प्राकार आहे. मध्यभागीं सभामंडप असून सभामंडपासमोर उंच चौथऱ्यावर ओवऱ्या आहेत. सभामंडपांतून


पुढें गेल्यावर उच्चासनावर मंगलमूर्ति विराजित झालेली दृष्टीस पडते. एका दर्शनमुग्ध भक्तानें या मूर्तीचें वर्णन असें केलें आहे :

नेत्रीं दोन हिरे, प्रकाश पसरे, अत्यंत ते साजिरे।
माथां सेंदुर पाझरे, वरि वरी दूर्वांकुरांचे तुरे॥
माझें चित्त विरे, मनोरथ पुरे, देखोनि चिंता हरे।
गोसावीसुत स्वामिराज कवि रे या मोरयाला स्मरे॥

हा मंगलमूर्ति मोरया भक्ताच्या सोयीसाठीं इथें नांदण्यास आला आहे. त्याचें वैभव भक्तांच्या भक्तीविना विफल आहे, याची त्याला पुरेपूर जाणिव असल्यानें तो आपणहून भक्ताघरीं नांदावयास येत असतो.

नाहं वसामि वैकुंठे, योगिनां हृदये पुनः।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद॥

अशी त्या सर्वेश्वराची ग्वाही आहे. आपल्या इहलोकांतील जीवनाच्या अखेरीस मोरया गोसावी चिंचवडास रहात आणि प्रत्येक चतुर्थीला मोरगांवची वारी करीत. वार्धक्यामुळें आपल्या भक्ताला या मासिक वारीचा त्रास होत आहे, याची मंगलमूर्तीला खंत वाटली. आणि त्यानें मोरयांना स्वप्नांत आदेश दिला कीं, "तूं इथें येण्याचें कारण नाहीं. आतां मीच तुझ्या घरीं येऊन रहातों. उद्यां सकाळीं गणेश-कुंडांत स्नान करीत असतां तुला जो प्रसाद प्राप्त होईल, तो चिंचवडास घेऊन जा आणि त्यालाच माझें स्वरूप मानून पूजीत जा." या आदेशानुसार मोरयांना गणेश-कुंडांत स्नान करतांना मंगलमूर्तीचा तांदळा प्राप्त झाला. त्याचीच प्रतिष्ठापना इथें चिंचवडास झाली. देव भक्ताघरीं नांदूं लागला आणि भक्ताच्या भक्ति-वैभवामुळें देवाचें राजवैभवहि वाढलें. ही घटना इ. स. १६४९ च्या सुमारास घडली.



वाड्यांतील मंगलमूर्ति

देवाचें चढतें-वाढतें वैभव :

श्रीमोरया गोसावी यांची समाधि आणि त्यांच्या भक्ति-प्रभावामुळें त्यांना लाभलेलें देवाचें सान्निध्य या दोन महत्त्वाच्या घटनांनीं चिंचवडचें महिमान पुणें प्रांतीं वाढूं लागलें. श्रीमोरयांच्या नंतर त्यांचे सुपुत्र श्रीचिंतामणि देव यांनींहि आपल्या पित्याचा प्रपंच-परमार्थाचा वारसा कौशल्यानें आणि समर्थपणें चालविल्या-मुळें चिंचवडच्या वैभवांत भरच पडूं लागली. चिंतामणींच्या कार-कीर्दींतच इ. स. १६५९ मध्यें समाधि-मंदिर उभें राहिलें आणि

७५१८८९ ... श्री प्रकाश
२५ ५०७ ... २२।३।७१


त्यानंतर सात वर्षांनीं मंगलमूर्तींचा वाडा उभारला जाऊन चिंचवड संस्थानचा प्रारंभ झाला. अनेक गांवें व वर्षासनें संस्थानला मिळत गेलीं. इतकेंच नव्हे तर कांहीं गांवांची सरदेशमुखीहि या संस्थानास मिळूं लागली. मलिकंबरनें श्रीमोरया गोसाव्यांस चिंचोली व मोरगांव येथें जमीन इनाम दिली होती, तिचा रोखा पुढें २० सप्टेंबर १६१९ मध्ये झाला. मोरगांवच्या इनामाबाबत अनेक ऐतिहासिक पत्रें उपलब्ध आहेत. ४ जानेवारी १६४५ मधील एका पत्रांत "मुकाम मोरेश्वरापासून सर्व वाटांवर चिंतामण गोसावी यांचे धान्यवाहक बैलांस जकात माफ केली आहे" असा उल्लेख आहे. हा क्रम अव्याहत चालू राहिला आणि मराठी राज्यकर्त्यांनीं संस्थानच्या वैभवाच्या वाढीस फार मोठा हातभार लावला. पेशवाईंत चिंचवडास दर्शनार्थ येणाऱ्या भाविकांत प्रत्यक्ष पेशव्यांचाहि समावेश असे.

अशा प्रकारें 'देवाचें वैभव' जसजसें वाढूं लागलें, तसतशी दर्शनेच्छूंची रीघहि वाढूं लागली. फकीर-फकडा आणि अतिथि-अभ्यागत येथें येऊन सर्वार्थानें संतुष्ट होऊं लागले. इ. स. १८५९ मध्यें संस्थान कमिटी निर्माण झाली आणि संस्थानाकडे असलेल्या सतरा-अठरा इनाम गांवांतून सुमारें एक लाखाच्या उत्पन्नाची केंद्रीभूत व्यवस्था सुरू झाली. चिंचवड संस्थानच्या व्यवस्थेखालींच मोरगांव, थेऊर व सिद्धटेक या तीन देवस्थानांचा कारभार चालूं लागला. इ. स. १८९० पासून तीन सवेतन विश्वस्तांच्या प्रभुत्वाखालीं संस्थानची व्यवस्था सुरू झाली.

या व्यवस्थेनुसार देवस्थानचा नित्य-नैमित्तिक उपासनाक्रम सुरळीत चालू आहे : श्रीमंगलमूर्तींच्या मंदिरांत सकाळीं पूजा-अभिषेक होत असतांना गवयाचें गाणें, नंतर सर्वपूजा, पोषाख व पहिला नैवेद्य होतो. पुढें पुराण व पुराणानंतर दुसरा नैवेद्य होतो.

दुपारीं पुराण, सायंकाळीं गवयाचें गाणें, नंतर नैवेद्य, पंचारती व शेजारती होऊन नित्यक्रम संपतो.

श्रीमोरयाच्या मंदिरांतहि अशीच नित्योपासना चालते. फक्त सकाळचें पुराण व गवयाचें गाणें तेथें नसतें. दोन्ही मंदिरांत देव-घराण्यांतील अधिकृत व्यक्तीनेंच पंचारती ओवाळावयाची असा संकेत आहे.

दर महिन्याची शुद्ध व वद्य चतुर्थी, एकादशी आणि सणाचे दिवस या निमित्तानें देवाला महापोषाख चढवितात. येथें वद्य चतुर्थीचें महत्त्व विशेष आहे. येथें येणारे बहुतेक दर्शनेच्छू संकष्ट-चतुर्थीचें व्रत धरतात. हा उपवास करणारांत अनेक मुसलमान भाविकहि असतात.

मंगलमूर्तीच्या देवस्थानाची चार सीमाद्वारें चार दिशांना मानलीं असून तेथें चार देवता स्थापन केल्या आहेत. पूर्वद्वार पिंपरी रस्त्यावर असून तेथें मांजराई व रमा-रमेश या देवतांची स्थापना केलेली आहे. दक्षिणद्वार वाकड रस्त्यावर असून तेथें आसराई व उमा-महेश या देवतांची स्थापना केलेली आहे. पश्चिमद्वार तळेगांव रस्त्यावर असून तेथें ओसराई व रति-कंदर्प या देवतांची स्थापना केलेली आहे; आणि उत्तरद्वार आकुर्डी रस्त्यावर असून तेथें मुक्ताबाई व महीवरा या देवतांचीं स्थापना केलेली आहे. श्रावण महिन्यांत शुद्ध प्रतिपदेपासून चार दिवस या चार सीमाद्वारांची 'द्वारयात्रा' असते.

भाद्रपदांतील गणेशचतुर्थीला श्रीमोरया गोसावी यांची पालखी मोरगांवीं जाते. आषाढी एकादशीला वारकरी संतांच्या पालख्या ज्याप्रमाणें थाटामाटानें पंढरपुरास जातात, त्याच्याच अनुकरणांतून हा पालखीचा सोहळा छोट्या प्रमाणांत चालू आहे. भाद्रपद शु. १ ला सकाळीं पालखी चिंचवडहून निघते.

बरोबर वाजंत्रीं, पताका-निशाणें, अब्दागिरी, चवऱ्या, मोरचेल, डंका, नगारखाना असा थाट असतो. माणसें बसण्याकरितां व सामान ठेवण्याकरितां बैलगाड्या असतात. पहिला मुक्काम पुणें येथें होतो. पुण्यास लकडी पुलावर पालखी आल्यावर तळेगांवकर दाभाडे यांच्याकडून किनखाबी पताका व पूजासामुग्री येते. दुसरा मुक्काम सासवडास होतो आणि तिसऱ्या दिवशीं रात्रीं पालखी मोरगांवीं पोंचते. चतुर्थीच्या दिवशीं देवाभक्तांच्या संगमानें साजरा होणारा महोत्सव प्रेक्षणीय आणि आनंददायी असतो. या भाद्रपदी



श्रीमोरया गोसावी (एका परंपरागत चित्रावरून)

यात्रेप्रमाणेंच माघी यात्रेसाठींहि श्रीमोरयांची स्वारी मोरगावीं जाते; परंतु ती त्या पालखींतून न जातां घोड्यावरून जाते.

चिंचवडचा मुख्य महोत्सव म्हणजे श्रीमोरया गोसावी यांच्या पुण्यतिथीचा. मार्गशीर्ष वद्य ३ पासून ६ पर्यंत चार दिवस हा महोत्सव गाजत असतो. या चार दिवसांत श्रीमंगलमूर्तींची स्वारी संस्थाननें बांधलेल्या भव्य सभामंडपांत आणून सिंहासनावर अधिष्ठित करतात. मंडप हंड्या-झुंबरांनीं व मखर-तसबिरींनीं सुशोभित करतात. रोषणाई, गायन-वादन आणि कथाकीर्तन यांमुळें वाडा शोभत-गाजत रहातो. सुगंधोपचार आणि वस्त्राभूषणांनीं देवाची पूजा बांधली जाते. श्रीमोरयांच्या समाधि-मंदिराच्या उत्तरेकडील पटांगणांत पूजा-द्रव्यें, मेवामिठाई, स्टेशनरी आणि धार्मिक वाङ्मय यांच्या दुकानांची मांडणी होते. दक्षिणेकडील पटांगणात पाकशाळा आणि भोजन यांसाठीं मंडप उभारण्यांत येतो. षष्ठीच्या दिवशीं ब्राह्मणभोजनाचा विराट् समारोह होतो. या षष्ठीच्या यात्रेस तीस-चाळीस हजार यात्रिकांचा मेळावा जमतो आणि 'मंगलमूर्ति मोरया' या नामगजरानें चिंचवडचा परिसर निनादून जातो.

चिंचवडचा प्रसाद:

'मंगलमूर्ति मोरया' चें दर्शन घेऊन परत फिरणाऱ्या यात्रिकांचें मन—जिज्ञासू यात्रिकांचें मन—मंगलमूर्तींच्या पायाशीं 'पसायदाना'ची याचना करतें. त्याला मंगलमूर्तींचा 'प्रसाद' हवा असतो—कृपा हवी असते. जीवनांतील मांगल्यावर असीम श्रद्धा, हाच मंगलमूर्तींचा प्रसाद आहे. अमंगलाचा, असत्याचा, असुंदराचा निरास करून, जीवनाला 'सत्यम्-शिवम्-सुंदरम्'चें त्रिवेणीतीर्थ बनविण्याचें सामर्थ्य या श्रद्धेंत आहे. जीवन हें अखंड-एकरस आहे, आनंदमय आहे, ज्योतिर्मय आहे, अणूहूनहि सूक्ष्म आहे आणि गगनाहूनहि व्यापक आहे, याच एकमेव अनुभूतीचा डंका

मंगलमूर्तींच्या चरणांशीं झडत आहे. व्यक्ति-जीवन वेगळें व समाज-जीवन वेगळें, स्थिर वेगळें व चर वेगळें – असा भेदाभेद व्यर्थ आहे. साऱ्या व्यष्टिसमष्टीला आणि स्थिरचराला व्यापून उरणारें हें जीवनतत्त्व आहे. याच अखंड – एकरस चैतन्याची उद्‌घोषणा सर्व ऋषिमुनींनीं आणि साधुसंतांनीं केली आहे. या विराट् जीवन-तत्त्वाच्या साक्षात्कारानेंच सर्व समस्यांचा निरास होतो.

मंगलमूर्ति गणेश हें जीवनाला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या शब्दब्रह्माचें प्रतीक आहे. मानवी जीवनाचा विराट् उपन्यास करणाऱ्या महर्षि व्यासांची वाणी शब्दबद्ध करण्यासाठीं प्रत्यक्ष गणेशानें हातीं लेखणी धारण केली होती. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या मंगलचरणांत या ॐकाररूप वाङ्मयगणेशाची महापूजा बांधली आहे. गणेशरूपाचें स्पष्टीकरण करतांना नाथ लिहितात –

तुजमाजीं वास चराचरा । म्हणोनि बोलिजे लंबोदरा ।
यालागीं सकळांचा सोयरा । साचोकारा तूं होसी ॥
सुखाचें पेललें दोंद । नाभीं आवर्तला आनंद ।
बोधाचा मिरवे नागबंद । दिसे सन्निध साजिरा ॥

मंगलमूर्तींची रक्तसिंदूरानें माखलेली आणि रक्ताभरणांनीं नटलेली मूर्तीच मुळीं मांगल्यसूचक आहे. कारण तांबडा रंग हा मांगल्याचें प्रतीक आहे. पाताळाचा वेध घेणारे आणि सदैव विनम्र होऊन रहाणारे दूर्वांकुर हें मंगलमूर्तींचें आवडतें पूजाद्रव्यहि यात्रिकाला एक अविस्मरणीय जीवनपाठ शिकविणारें आहे. मयुरेश्वराच्या – 'मोरया'च्या प्रसादानें मोरया गोसावी 'देव' बनले; मंगलमूर्ति आणि मोरया यांचें अद्वैत झालें. त्या अद्वैताच्या जाणिवेनें वेडावललें आपलें हृदय आपोआपच गर्जून उठतें –

"मंगलमूर्ति मोरया !"

* * *

# देववाणी

श्रीमोरया गोसावी हे आपल्या असीम भक्तीनें देवस्वरूप बनल्यामुळें त्यांचें मूळचें 'शाळिग्राम' हे उपनाम लुप्त झालें आणि 'देव' हेंच उपनाम त्यांच्या घराण्यांत रूढ झालें. खालीं श्रीमोरया गोसावी, त्यांचे सुपुत्र श्रीचिंतामणि महाराज आणि चिंतामणि-महाराजांचे पणतु श्रीधरणीधर महाराज या तीन सत्पुरुषांची 'देव-वाणी' प्रसाद म्हणून सादर केली आहे.

**श्रीमोरया गोसावी :**

: १ :

हें मन वेधलें हो मोरयाचे ध्यानीं । आणिक नावडे या मोरयावांचोनी ॥
कथा मोरयाची सांग माझे कानीं । नाहीं तर प्राणा होऊं पाहे हानी ॥
मज हांसतील, परी हो हांसोत । परी मज सांगा या मोरयाची मात ॥
तेणें मनींचें हो पुरेल आरत । नाहीं तर प्राणा होऊं पाहे घात ॥
या हो जनासी काय मज काज । दीनानाथ कृपाळु महाराज ॥
एकदंत हो सुंदर चतुर्भुज । तोच हृदयीं आठवतो मज ॥
मोरया गोसावी हो एकरूप देहीं । दीन रंक मी रुळे त्याचे पायीं ॥

**श्रीचिन्तामणि महाराज·**

: २ :

मज सुख पावलें हो, मोरया देखिला हो, श्रम माझा हरला हो ॥
केलें विघ्नेश—भजन । तेणें नाशिलें मी-तूपण ॥
यातायाती मी चुकलों । चरणीं तुझ्या विनटलों ॥
घेतां नाम तुझें वाचे । भय नाहीं रे दोषाचें ॥
न करितां तप-तीर्थें । कृपा केली गणनाथें ॥
पूर्वपुण्य जोडी झाली । भेटली गणराजमाउली ॥

भाग्योदय थोर माझा । शरण आलों मी गणराजा ॥
चिनवी चिंतामणि दास । अखंड देई भक्तिरस ॥

**श्रीधरणीधर महाराज :**

: ३ :

तुज मागतों मी आतां । मज द्यावें एकदंता ॥
तुझे ठायीं माझी भक्ति । विरूढावी गणपति ॥
तुझे ठायीं ज्याची प्रीति । त्याची घडावी संगति ॥
धरणीधरा ऐसें द्यावें । सर्वांभूतीं लीन व्हावे ॥

: ४ :

तुज शरण शरण । आलों, पतित मी जाण ॥
तुझा अपराधी मी खरा । आहें इक्षुचापधारा ॥
माझी येऊं दे करुणा । तुजलागीं गजानना ॥
धरणीधरा तुजवीण । दासा नाहीं दुजेपण ॥

: ५ :

नाम घ्यारे मोरयाचें । तरी सार्थक जीवाचें ॥
कलियुगीं नामावीण । अन्य उपाय नसे जाण ॥
नामें बहुत तरले । पुन्हा जन्मासी न आले ॥
धरणीधरा मज द्यावें । नित्य नाम[illegible] ॥



ग्रंथ संग्रहालय
शाखा
[illegible] ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
[illegible] ७५१७९ [illegible]

# संस्कृत साहित्य सरिता

स्मरणीय सुभाषितांसह नवी आवृत्ति

## संस्कृत भाषेंतील प्रसिद्ध काव्य-नाटकांचें

## मराठी सुबोध कथासार : प्रत्येकीं ३२ पानांत

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : १
११. दशकुमारचरित : २
१२. वेणीसंहार
१३ कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमि
१५. हर्षचरित
१६. नागानन्द
१७. पंचरात्र
१८. रत्नावलि
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८ [illegible]यायोग


REFBK-0017198

[illegible] ा
[illegible]रिणय
३२. नलोदय नैषध

विद्यार्थी, नवशिक्षित, अल्पशिक्षित व सामान्य वाचकवर्ग यासाठीं

**३२ पानांचें एक पुस्तक : प्रत्येकीं ७५ नये पैसे.**

**पुठ्ठ्याच्या मजबूत पेटींतून बत्तीस पुस्तकें एकत्र**




पंढरपूर—पांडुरंग, सज्जनगड – रामदासस्वामी, आळंदी – ज्ञानेश्वर, पैठण – एकनाथ. जेजुरी – खंडोबा, देहू – तुकाराम; त्र्यंबकेश्वर-नाशिक – श्रीराम; चिंचवड – मोरया गोसावी; कोल्हापूर – महालक्ष्मी; औदुंबर-नरसोबाची वाडी – दत्तात्रय; तुळजापूर—भवानी, नेवासें—मोहिनीराज, ज्ञानेश्वर, कवळें—शांतादुर्गा, मंगेश—शंकर, भीमाशंकर – ज्योतिर्लिंग, परशुराम – परशुराम; शिखर-शिंगणापूर – शिवाजी, हरिहरेश्वर – पेशवे; गाणगापूर – नरसिंह सरस्वती, माहूर दत्त, देवी; आंबे जोगाई– देवी; औंढ्या नागनाथ – ज्योतिर्लिंग; परळी वैजनाथ – ज्योतिर्लिंग, वेरूळ – लेणीं, ज्योतिर्लिंग, नांदेड – गोदावरी; बीड – कंकालेश्वर, रामटेक सीता-राम, तालबर्डी = यात्रा; अमरावती – अंबादेवी, मुक्तागिरी – जैन-क्षेत्र, चांदा – महाकाली शेगांव – गजानन महाराज, कौंडिण्यपूर – पांडुरंग; कळम्ब = चिंतामणी; दक्षिणद्वार देवगिरी – दौलताबाद.

* * *

# सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

**सहा पुस्तकें : संच १ ला**

१. सुंदर तें ध्यान : पंढरपूरचा पांडुरंग
२. जय जय रघुवीर समर्थ : समर्थांचा सज्जनगड
३. ज्ञानोबा माउली : ज्ञानदेवांची आळंदी
४. एका जनार्दनी : एकनाथांचें पैठण
५. मल्हारी मार्तंड जेजुरीचा खंडोबा
६. तुका झालासे कळस : तुकारामांचें देहू

**सहा पुस्तकें : संच २ रा**

१. श्रीगोदे, भवताप हरी ! : त्र्यंबकेश्वर; नाशिक
२. मंगलमूर्ति मोरया : मोरया गोसाव्यांचें चिंचवड
३. जय जगदंब : कोल्हापूरची अंबाबाई
४. श्रीगुरुदेव दत्त नरसोबाची वाडी; औदुंबर
५. जय भवानी : तुळजापूरची भवानी
६. माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिकें : नेवासें

**सहा पुस्तकें : संच ३ रा**

१. गोमांतकाची शांतिशक्ति शांतादुर्गा (कवळें)
२. पार्वतीपते ! हर हर महादेव : श्रीमंगेश
३. 'डाकिन्याम् भीमशंकरम्' : भीमाशंकर
४. दलितांचा कैवारी भार्गवराम परशुराम
५. छत्रपतींचें कुलदैवत शिखर शिंगणापूर
६. श्रीगुरूंचें गंधर्वपूर : गाणगापूर

**आठ पुस्तकें : संच ४ था**

१. मंदिरमाला मुक्तागिरी मुक्तागिरी
२. इथे टेकले श्रीराम रामटेक
३. 'उदयोऽस्तु अम्बे !' : अमरावती
४. विदर्भ-पंढरी : कौंडण्यपूर
५. अगस्त्यांचें संस्कृति-केंद्र : तालबर्डी
६. चन्द्रपूरची महाकाली : चन्द्रपूर
७. शेगांव-संतस्थान : शेगांव
८. स्वयंभू चिन्तामणी : कळंब

**सहा पुस्तकें : संच ५ वा**

१. मातापूरची जगन्माता : माहूर
२. बारवें ज्योतिर्लिंग : वेरूळ
३. योगेश्वरीचें माहेर : आम्बेजोगाई
४. 'परल्यां वैद्यनाथं' च परळी वैजनाथ
५. 'नागेशं दारुकावने' औंढ्या नागनाथ
६. दक्षिणद्वार देवगिरी : दौलताबाद